दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



आजचा रंग
पांढरा

घटस्थापना
शारदीय
नवरात्रोत्सवाच्या
सर्वांना मंगलमय शुभेच्छा !



वर्ष : ०५ | अंक : ३८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२२ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार

## कृषीमंत्र्यांचा शब्द; कर्जमाफीवर दिला विश्वास



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बारामती :** भाजप नेते गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्यावर खालच्या भाषेत टीका केली होती. यावरून राष्ट्रवादीच्या नेत्यांनी जाहीर निषेध व्यक्त केला होता. या विधानावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. भरणे म्हणाले की, कोणीही असुद्या, कोणी कोणावर वैयक्तिक टीका राजकारणात करू नये. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी करावं. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत खुलासा केला आहे, अशी प्रतिक्रिया भरणे यांनी दिली.

पुणे जिल्ह्यातील भिगवण येथे ग्रामीण रुग्णालयात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ' स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियानाचे उद्घाटन पार पडले. यावेळी भरणे यांनी पत्रकारांची संवाद साधला.

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणार

राज्यात मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे झाले. मात्र अद्याप काही शेतकऱ्यांना त्याची नुकसान भरपाई मिळाली नसताना सध्याही राज्याच्या विविध भागात पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. याचे पंचनामे सुरू आहेत. मात्र दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा प्रयत्न राज्य सरकारचा असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

### कर्जमाफीची योग्य वेळ कधी?

कर्जमाफीची योग्य वेळ कधी येणार? या प्रश्नावर बोलताना भरणे म्हणाले की, शेतकरी आज खूप अडचणीत आहे. कधी दुष्काळ पडतोय कधी अतिवृष्टी कधी गारपीट होत आहे. शेतकऱ्यांच्या पाठीमागे राहणं काही ना काही त्यांना आर्थिक पाठबळ देणं ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. कर्जमाफीच्या बाबतीत सुद्धा राज्याचे मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री योग्य वेळी योग्य निर्णय घेतील. मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आमचे ज्येष्ठ आहेत योग्य वेळी योग्य निर्णय घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रोहित पवारांच्या प्रश्नावर बोलताना भरणे म्हणाले की, मी काल अकोला, वाशिम, हिंगोली, नांदेड दौऱ्याच्या दौऱ्यावर होतो. अधिकारी असतो कामकाज करताना थोडं कमी जास्त होत असेल. मी ते जास्त ऐकलेलं नाही. एखादा अधिकारी चुकला असला तर त्याला शेवटी कागदावर घेऊन काही गोष्टी बोलल्या पाहिजेत, असेही भरणे यावेळी म्हणाले.

# आझाद मैदानावर धडकणार कुणबी वादळ !

## सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** कुणबी नावाने ओबीसी मध्ये येणाऱ्या मराठ्यांची घुसखोरी ताबडतोब थांबविण्यात यावी त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने दि. २ सप्टेंबर, २०२५ रोजी हैद्राबाद गॅझेटीअर मधील नोंदीचा हवाला घेवून मराठा व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी काढलेल्या जी. आर. च्या विरोधात सकल कुणबी समाज आपल्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरणार असून कुणबी समाजोन्नती संघ-मुंबई मातृसंस्थेच्या नेतृत्वाखाली गुरुवार दि.०९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वा.आझाद मैदान,मुंबई येथे ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन कुणबी एल्गार मोर्चा काढण्यात येणार असून मुंबई सह ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहयोगी संस्था तसेच संपूर्ण कोकणातील कुणबी (ओबीसी) समाज मोठ्या संख्येने मुंबईत दाखल होणार असल्याने सत्ताधारी तसेच राज्य सरकार यांच्या समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# मंत्रालयात २३ ते २६ सप्टेंबर कालावधीत नवतेजस्विनी प्रदर्शनाचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, ठाणे :** ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना शहरी ग्राहकवर्गाशी थेट जोडणे, विक्रीला चालना देणे आणि महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळकटी देणे यासाठी त्यांच्या उत्पादनांच्या नवतेजस्विनी प्रदर्शनाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात करण्यात येणार आहे. हे प्रदर्शन दि. २३ ते २६ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत असणार आहे, अशी माहिती माविमच्या व्यवस्थापकीय संचालिका राजलक्ष्मी शाह यांनी दिली आहे.

हे प्रदर्शन महिला व बालविकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) मार्फत आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डिकर आणि सचिव डॉ. अनुप कुमार यादव हे भेट देऊन ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देतील.

या प्रदर्शनात एकूण १२ स्टॉल्स उभारले जाणार असून, त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आकर्षक बांबूच्या वस्तू, गोंदियाच्या लाखेच्या बांगड्या, वारली कलेच्या वस्तू, चित्रे, पौष्टिक व चविष्ट मिलेटयुक्त पदार्थ यांसारखी उत्पादने असणार आहेत.

# मंडणगडमध्ये शाळकरी मुलीचा विनयभंग

## शिक्षकासह ९ जणांविरोधात गुन्हा

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२१, मंडणगड (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील बाणकोट सागरी पोलिस ठाण्यात अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकासह एकूण १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, २३ जुलै रोजी शाळा सुटल्यानंतर संशयित शिक्षक निलेश अशोक कांबळे यांनी मोबाईल चार्जरच्या कारणावरून दोन विद्यार्थिनींना घरी बोलावले. त्यापैकी एका विद्यार्थिनीला दुकानात पाठवून दुसऱ्या मुलीला हॉलमध्ये नेऊन तिचा हात धरून अश्लील प्रकार केला. घाबरलेल्या मुलीने घरी गेल्यावर नातेवाईकांना याची माहिती दिली.

पालकांनी तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला असता, गावातील काही जणांनी दबाव आणून तसे न करण्यास भाग पाडले. मात्र दीड महिन्यानंतर, १९ सप्टेंबर रोजी पीडितेच्या पालकांनी औपचारिक तक्रार पोलिसांकडे नोंदवली.

या प्रकरणी शिक्षक कांबळे यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS 2023) कलम ७४ तसेच POCSO कायदा २०१२ कलम ८, १२ आणि २१ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. तसेच तक्रार रोखण्यासाठी दबाव आणल्याप्रकरणी प्रकाश रामजी शिगवण, सुभाष रामजी शिगवण, वैभव पांडुरंग भानसे, पांडुरंग यशवंत शिगवण, रघुनाथ गुणाजी भानसे, शंकर रामजी होडबे, मनोहर जानू जोशी, संदीप यशवंत कांबळे आणि राकेश साळुंखे या नऊ जणांविरोधातही गुन्हे दाखल झाले आहेत.

बाणकोट सागरी पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय चव्हाण यांनी गुन्हा नोंद झाल्याची माहिती दिली.

# अखेर तहसिलदारांच्या संवेदनशीलतेने चिमुरडीच्या उपचाराचा मार्ग मोकळा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, निफाड (नाशिक) :** वाकद येथील आदिवासी कुटुंबातील कु.वैष्णवी लहू दळवी या चिमुरडीला हृदयविकारासाठी तातडीने उपचारांची गरज होती. मात्र शिधापत्रिका व आधारकार्ड नसल्याने मोफत उपचारात अडथळा निर्माण झाला होता.

स्थानिक पत्रकारांच्या पुढाकारानंतर तहसिलदार मा. विशाल नाईकवाडे यांनी संवेदनशीलता दाखवत आवश्यक कागदपत्रांची सोय केली. सामाजिक कार्यकर्ते अशोक वाळुंज यांच्या प्रयत्नांतून महात्मा फुले जीवनदायी योजनेचा लाभ मिळाला. त्यामुळे वैष्णवीला नाशिक येथे उपचारासाठी हलवून साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये दाखल करण्यात आले.कोणतेही मूल उपचाराअभावी वंचित राहू नये, असे आश्वासन तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी दिले असून संजय गांधी निराधार योजनेतून आर्थिक मदतीची तरतूदही करण्यात येणार आहे.

# नवी मुंबई हे विविध खेळांना प्राधान्य देणारे शहर : आयुक्त डॉ.कैलास शिंदे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** पामबीच मार्गावर धावणे हे प्रत्येक धावपटूचे एक स्वप्न असते त्यामुळे सिटी हेल्थ रनला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचा आनंद व्यक्त करीत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छ व सुंदर शहराप्रमाणेच विविध खेळांना प्राधान्य देणारे शहर ही नवी मुंबईची ओळख दृढ होत असल्याचे सांगितले.

धावणे हा एक उत्तम व्यायाम असून यामुळे शारीरिक तंदुरूस्ती सोबतच मानसिक आरोग्यही चांगले राहते असा स्वानुभव असल्याचे आयुक्तांनी सांगितले. दक्षिण आफ्रिकेतील जगप्रसिध्द कॉम्रेड रनमध्ये आयुक्त दोनदा सहभागी झाले असून धावण्यामुळे मेंदू व मनाचा व्यायाम होतो तसेच सकारात्मक ऊर्जा मिळते त्यामुळे रनकडे केवळ धावणे म्हणून न पाहता सर्वसमावेशक व्यायाम म्हणून पाहतो असे ते म्हणाले.




सकाळ वृत्तपत्र समुहाच्या वतीने इंडिया रनींग या नामांकित संस्थांच्या सहयोगाने पामबीच मार्गावर आयोजित १० किमी, ५ किमी व ३ किमी 'नवी मुंबई सिटी हेल्थ रन' प्रसंगी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, बिग बॉस मराठी विजेते नृत्यदिग्दर्शक शिव ठाकरे, सुप्रसिध्द अभिनेत्री मृण्मयी देशपांडे, अभिनेते राहुल पेठे व करण परब आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यापुढील काळात नवी मुंबईत विविध क्रीडा प्रकारांना संधी देणारे उपक्रम आयोजित करण्यात येत असल्याचे व त्यासोबतच निरनिराळ्या खेळांना पोषक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अशा स्पर्धांतूनच उद्याचे ऑलिंपिकपटू घडतील असा विश्वास व्यक्त केला. या रनमध्ये नवी मुंबई प्रमाणेच इतर शहरांतूनही नियमित धावण्याचा सराव करणारे उत्साही धावपटू मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल तसेच १० किमीचे अंतर ३९ मिनीटात पूर्ण करणारे यशस्वी उत्तम धावपटू रनमध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. नवी मुंबई महानगरपालिकेचे सहा.आयुक्त जयंत जावडेकर तसेच उपअभियंता गजानन पुरी व माजी उपआयुक्त शरद पवार यांनी १० किमी रनमध्ये सहभागी होत यशस्वीपणे अंतर पूर्ण केले. त्यांच्यासह सर्वच विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले.

केंद्र सरकारच्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिका या नवी मुंबई सिटी हेल्थ रनमध्ये स्वच्छतेचा आरोग्याशी असलेला परस्पर संबंध लक्षात घेऊन सहभागी झाली होती. या माध्यमातून उपस्थित धावपटूंमध्ये स्वच्छतेच्या सवयी नियमितपणे अंगिकारण्याचा संदेश व्यापक स्वरूपात प्रसारित करण्यात आला.

# मोठी धरणे, मध्यम प्रकल्प तुडूंब !

## अहिल्यानगरची स्थिती ; कोपरगाव, राहाता, श्रीरामपूरमध्ये पावसाचे प्रमाण कमी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** यंदा अहिल्यानगर जिल्ह्यात विशेषतः दक्षिण भागात वरूणराजाची चांगलीच कृपा असल्याचे दिसत आहे. मात्र, जिल्ह्याच्या उत्तर भागातील कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, संगमनेर आणि अकोले तालुक्यांतील अनेक भागात पावसाचे प्रमाण कमी आहे. या ठिकाणी जून ते सप्टेंबर अखेर पडणार्या एकूण पावसाच्या सरासरीच्या ६० ते ८० टक्के पाऊस झाला आहे. असे असले तरी जिल्ह्याच्या शेतीसाठी वरदान असलेल्या मोठ्या धरणांमध्ये आणि मध्यम प्रकल्पांमध्ये शतप्रतिशत पाणीसाठा असल्याने यंदा शेतीसह पिण्याच्या प्रश्नाचे निराकरण होणार आहे.

यंदा जिल्ह्यात मान्सून पावसाने जोरदार सलामी दिली. या पावसाचे प्रमाण सुरूवातीपासून दक्षिण जिल्ह्यात अधिक होते. जून महिन्यात मान्सूनचे आगमन झाल्यानंतर ऑगस्टपर्यंत मोठ्या पावसात खंड पडल्याचे दिसून आले. पण सुरूवातीला जोरदार बरसलेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला चालना मिळाली. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात जिल्ह्याच्या दक्षिणेकडील काही तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली. यामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सप्टेंबर महिन्यातही अशीच परिस्थिती दिसून येत आहे. दरम्यान, जिल्ह्यात पडणार्या पावसापेक्षा धरणांच्या कॅचमेंट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे जिल्ह्यासाठी वरदान ठरणार्या मुळा, भंडारदरा आणि निळवंडे धरणांमध्ये जवळपास १०० टक्के पाणीसाठा आहे. सध्या अनेक धरणांमधून आणि प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असून यामुळे नदी काठावरील गाव परिसरात सध्या पाणीच पाणी दिसत आहे.

**या धरणात १०० टक्के पाणीसाठा !**

भंडारदरा,मूळा, निळवंडे, आढळा, मांडओहळ, पारगाव, घाटशीळ, सीना,खैरी आणि विसापूर या ठिकाणी शंभर टक्के पाणीसाठा आहे. मागिल वर्षी यातील मांडओहळमध्ये ४८ टक्के,घाटशीळमध्ये १२ टक्के तर मुख्य धरणात ९८ ते ९९ टक्के पाणीसाठा होता. धरणाच्या लाभक्षेत्रात अद्याप पावसाने उघडीप दिलेली नाही. त्यामुळे धरणात पाण्याची आवक सुरू आहे.

तीन मोठ्या धरणांसह जिल्ह्यात सहा महत्त्वाचे माध्यम प्रकल्प आहेत. हे सर्व नगर दक्षिणेत असून या प्रकल्पांत शंभर टक्के पाणीसाठा झाला आहे. यातील काही प्रकल्प महिनाभरापूर्वीच ओसंडून वाहू लागले होते. यामुळे यंदा रब्बी हंगामासाठी उन्हाळी हंगामातील शेतीसाठी पाण्याचा प्रश्न निकाली लागणार आहे. दरम्यान, जिल्ह्यात जून ते सप्टेंबर दरम्यान पडलेल्या एकूण पावसाच्या प्रमाणात जिल्ह्यातील उत्तर भागातील कोपरगाव तालुक्यात आत्तापर्यंत ६०.३ टक्के, राहाता तालुक्यात ७०.८ टक्के श्रीरामपूर ७१.८ टक्के राहुरी ७२ टक्के, संगमनेर ७३.५ टक्के, जामखेड ७८ टक्के, अकोले तालुक्यात ७९ टक्के आणि नगर ८० टक्के पाऊस झाला आहे. तर सरासरीच्या तुलनेत सर्वाधिक पाऊस पाथर्डी तालुक्यात ११९ टक्के, कर्जत १०७ टक्के, शेवगाव आणि नेवासा १०५ टक्के, पारनेर ८८ टक्के, श्रीगोंदा ८८ टक्के झाला आहे.

# संपादकीय

## नशेखोरी समूळ नष्ट व्हावी!

राज्यातील अनेक भागांत नशेखोरीने उच्छाद मांडला आहे. अगदी ग्रामीण भागापर्यंत त्याचे लोण पसरले दिसते. छत्रपती संभाजीनगरदेखील यास अपवाद नाही. या गोष्टीची चिंता सत्ताधारी, विरोधक व राज्यातील धुरिणांना आहे की नाही, असा प्रश्न पडण्याजोगी स्थिती आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये गणेशोत्सवानिमित्त झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत सर्व लोकप्रतिनिधींनी नशेखोरीवर जाहीर भाष्य करत पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी केली. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी अमली पदार्थ प्रतिबंधक पथकाची (एनडीपीएस) स्थापना केली. स्वतंत्र पोलिस निरीक्षक नेमून पथक नेमले. यापूर्वीही असे पथक नेमून कारवाईचा प्रयत्न झाला होता. माजी खासदार इम्तियाज जलील यांनीही नशेखोरीविरुद्ध व्यापक मोहीम उघडली होती. मात्र, त्यात पुढे अपेक्षित कार्यवाही होत नव्हती. यंदा पोलिस आयुक्तांनी पुढाकार घेतला आणि नशेखोरीविरोधातील कारवाईने वेग घेतला.

या संदर्भातील आकडेवारी सांगते, की २०२३मध्ये एनडीपीएस कारवाई अंतर्गत ३७ गुन्ह्यांत ५२ जणांना ताब्यात घेतले गेले. ३९ लाख ४४ हजार ८३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला. २०२५मध्ये २५१ गुन्हे दाखल झाले. त्यात गांजा, चरस, एमडी ड्रग्जसह नशेसाठी वापरण्यात येणारी औषधेदेखील पोलिस कारवाईत सापडली. १२ सप्टेंबरला एका कंपनीच्या परिसरात केलेल्या पोलिस कारवाईत मोठे रॅकेट हाती लागले. त्याच्या चौकशीतून उत्तराखंड येथून कोडिनयुक्त सीरप मागविण्यात आल्याचे स्पष्ट झाले. ४१ जणांवर गुन्हा दाखल झाला. त्यात काही पेडलर्स आहेत. नशेसाठी शहरात येणारे साहित्य, गांजा हे मुंबई, पुणे या शहरांसह ओडिशा, गुजरातसह देशातील अनेक राज्यांतून येत असल्याची पोलिसांची माहिती आहे.

मुळात नशेखोरीच्या सामग्रीचा प्रवास असा बिनदिक्कत होतोच कसा? एरवी कुठल्याही शहरात येणाऱ्या गाड्यांची तपासणी होते. त्यातही बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष असते. अशी यंत्रणा असूनही नशेखोरीचे कोट्यवधींचे साहित्य येते कसे? त्यातील कुणावर कुणाचा वरदहस्त आहे का? नशेखोरीच्या उद्योगाला कायद्याच्या कचाट्यात कायमचे अडकवणे ही आजची गरज आहे. नशेच्या औषधांची विक्री करणाऱ्यांविरोधात 'मकोका'अंतर्गत कडक कारवाईचे संकेत पोलिस आयुक्तांनी दिले आहेत. याबाबत काही माहिती असल्यास थेट संपर्क करण्यासाठी मोबाइल क्रमांकही दिला आहे. यामुळे समाजात सकारात्मक संदेश जाऊन नागरिकांनीही पुढे येणे अपेक्षित आहे.

काही गुन्हेगारांची धिंड काढून नशेच्या औषधांचा व्यापार करणाऱ्यांना जरब बसावी, असा प्रयत्न केला जात असला, तरी मुळात अशा प्रकारची धिंड काढण्याची वेळच येऊ नये, अशी ठोस कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. तरुणाईमध्ये नशेचे प्रमाण चिंताजनक आहे. त्यामुळे कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. सामाजिक स्वास्थ्यदेखील धोक्यात आले आहे. अगदी छोट्या कारणावरून, कुरबुरीवरून थेट खून करण्यापर्यंतची प्रकरणे गेल्या काही वर्षांत शहरात वाढली आहेत. याला नशेखोरीचीच किनार असल्याचे उघड झाले आहे.

केवळ पोलिस किंवा एखाद्या सरकारी विभागानेच हे सर्व थांबवावे, असा संकुचित विचार होऊ नये. प्रत्येक शहरवासी; किंबहुना राज्यातील प्रत्येक नागरिकाने नशेखोरीला आळा घालण्यासाठी पुढे आले पाहिजे. औषधांचा वापर रुग्णाला बरे करण्यासाठीच हवा आणि प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे मिळू नयेत; निदान नशेसाठी वापर होऊ शकणाऱ्या औषधींची विक्री ही प्रिस्क्रिप्शनशिवाय होऊच नये. यातील प्रत्येक व्यवहाराची पारदर्शी नोंद असावीच; शिवाय जबाबदारीही निश्चित असावी. एखाद्या भागात सातत्याने नशेच्या औषधांचा वापर होत असल्याचे स्पष्ट झाले, तर अशी औषधे खरेदी करणाऱ्यांचा माग काढणे आवश्यक आहे. हे सर्व समन्वयातून झाले आणि नागरिकांनीही आपली चोख भूमिका निभावली तर छत्रपती संभाजीनगर नशेखोरीमुक्त होण्यास वेळ लागणार नाही.

# नवरात्रीचे नऊ रंग व त्यांचे महत्त्व !

शारदीय नवरात्री हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हा सण साजरा केला जातो. हा नऊ दिवसांचा उत्सव दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. या काळात देवीच्या प्रत्येक रूपाची पूजा केली जाते.

हिंदू धर्मात नवरात्री अर्थात घटस्थापने दरम्यान संपूर्ण देशभरात देवीची पूजा केली जाते. नवरात्री दरम्यान नऊ दिवस उपवास व देवीची पूजा अर्चना करतात.या प्रत्येक दिवसासाठी एक विशिष्ट रंग ठरलेला असतो. हे रंग केवळ परंपरेचा भाग नसून, त्यांचे आध्यात्मिक महत्त्व ही आहे. यातील प्रत्येक रंग देवीच्या विशिष्ट गुणांचे आणि शक्तीचे प्रतीक मानले जातो. या नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे परिधान केल्याने देवीचा विशेष आशीर्वाद मिळतो, असे म्हटले जाते.

नवरात्र म्हटलं की गरबा, दांडिया यासोबतच नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे घालण्याची एक वेगळी गंमत असते. येत्या २२ सप्टेंबरपासून शारदीय नवरात्रोत्सव सुरु होणार आहे. नवरात्रीतील नऊ रंगांचे महत्त्व देवीच्या विविध रूपांचे प्रतीक आहे, तसेच ते सणाचा आनंद, सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिकतेचे प्रतिनिधित्व करतात. हे रंग दरवर्षी कॅलेंडरनुसार बदलतात आणि प्रत्येक दिवसाच्या विशिष्ट देवी रूपाशी जोडलेले असतात. सामान्यतः, पांढरा रंग शांतता, लाल रंग उत्साह, पिवळा रंग आनंद, हिरवा रंग समृद्धी, रॉयल निळा रंग देवत्व,



राखाडी रंग नम्रता, नारंगी रंग चैतन्य, जांभळा रंग उत्साह आणि मोरपंखी हिरवा रंग एकता दर्शवतो.

### रंगांचे महत्त्व आणि प्रतीकात्मकता

**पांढरा** : हा रंग शुद्धता, शांती आणि नवीन सुरुवात दर्शवतो.

**लाल** : लाल रंग ऊर्जा, उत्साह आणि पराक्रमाचे प्रतीक आहे, जो दुर्गामातेच्या पराक्रमी रूपाला प्रिय आहे.

**रॉयल निळा** : हा रंग देवत्व आणि शांततेचे प्रतीक आहे.

**पिवळा** : पिवळा रंग आनंद, प्रकाश आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतिनिधित्व करतो.

**हिरवा** : हिरवा रंग समृद्धी, नवीन जीवन आणि वाढ दर्शवतो.

**राखाडी (ग्रे)** : हा रंग नम्रता आणि संतुलित वृत्तीचे प्रतीक आहे.

**नारंगी (ऑरेंज)** : नारंगी रंग चैतन्य, ऊर्जा आणि उत्साहाचे प्रतिनिधित्व करतो.

**जांभळा (पिंगट/पर्पल)** : हा रंग उत्साह आणि भक्ती दर्शवतो.

**मोरपंखी हिरवा (पीकॉक ग्रीन)** : हा रंग एकता, प्रेम आणि विश्वाचे प्रतिनिधित्व करतो.

### रंग कसे बदलतात?

नवरात्रीचा काळ चंद्राच्या कॅलेंडरवर आधारित असतो, त्यामुळे प्रत्येक वर्षी सुरुवातीची तारीख बदलते. या तारखेनुसार रंगांचा क्रम निश्चित केला जातो. त्यामुळे, दरवर्षी रंग बदलतात आणि प्रत्येक रंगाचे महत्त्व विशिष्ट दिवसाच्या देवीच्या रूपाशी जोडलेले असते.

नऊ रंगांचे कपडे परिधान केल्याने सकारात्मक ऊर्जा मिळते आणि नकारात्मकतेचा नाश होतो. आपल्या परिधानातून एकता दर्शवण्यासाठी अशाप्रकारे नऊ रंगांचे कपडे घातले जातात.

हे रंग देवीच्या विविध रूपांशी आणि गुणांशी संबंधित आहेत, ज्यामुळे तिची कृपा प्राप्त होते.

हे रंग सणाला एक विशेष उत्साह आणि आनंदी वातावरण देतात.

या वर्षी तुम्ही नवरात्रीच्या उत्सवाला उपस्थित राहाल तेव्हा ही रंगांची नियमावली लक्षात ठेवा आणि दररोज वेगळा पोशाख आणि त्यासोबत अनुरूप दागदागिने आणि मेकअप परिधान करा. नवरात्रीच्या रंगांचे महत्त्व जाणून घेतल्यामुळे तुम्ही तुमच्या देखणेपणाला अधिक योग्यप्रकारे अभिव्यक्त करू शकता. गरबा आणि दांडिया रासच्या रात्रीही तुम्ही या चैतन्यमय रंगांचा आनंद लुटू शकता!

**– श्रीराम साहेबराव महाजन –**
**(कलाशिक्षक )**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल.**
**चेंबूर, मुंबई ७१**

# नवरात्रीचे नवरंग अन गावाकडचं मायचं लुगडं



**– विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

नवरात्रोत्संवात नऊ दिवसाच्या नऊ रंगांच्या साड्या, पातळ नेसण्याचा ट्रेंड चालू आहे. या याला ट्रेंडच म्हणावं लागेल, कारण याला शास्त्राचा आधार कुठेच नाही.केवळ ही एक व्यापाऱ्याच्या कल्पनेतून उदयास आलेली कल्पना आहे. हल्ली या महिला त्याला बळी पडत आहे.दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये या पद्धतीने या सर्व गोष्टी घडताहेत. हल्ली परिस्थिती खूप बदलली आहे.आनंद आहे. बदलायलाच हवी. कारण काळ झपाट्याने बदलतोय. त्याअनुषंगाने वैचारिक पातळी बदलायलाही हवी. मात्र तुम्ही कोणत्या दिशेने चालले आहात.याचे भान हवे. फॅशन, ट्रेंड या भरकटलेल्या वाटेवर निघालात तर अशा विनाशाच्या जंगलात जाऊन अडकणार की तिथून बाहेर निघणे शक्य होणार नाही.

बदलत्या काळानुसार, कपड्यांची उपलब्धता त्याला अनुसरून ही वेगवेगळी ट्रेण्ड, फॅशन चालू झाली आहे. मात्र, एवढे असूनही फॅशनच्या नावाखाली अंगप्रदर्शन करणे चालू आहे. याला कुठली प्रगती म्हणावी? कधीकाळी लज्जारक्षणासाठी वस्त्र नव्हती तर मानवाने झाडाची पाने वापरून लज्जारक्षण केले. कालांतराने कापड निर्मिती व्हायला लागली. मात्र लोकसंख्येच्या तुलनेत आणि विकासाबरोबर इतर गोष्टींची अनुउपलब्धता यामुळे कपड्यांची निर्मिती फारशी नव्हती. वाढती महागाई, अपुरी दळणवळणाची साधने त्यामुळे खेडे-पाडे, वाड्या वास्त्यांपर्यंत कारखान्यातून तयार झालेला कपडा गोर-गरिबापर्यंत पोहचत नव्हता. त्यामुळे मागील पंधरा ते वीस वर्षाअगोदरच्या काळात ग्रामीण भागामध्ये बिकट परिस्थिती होती. गावाकडच्या माय-माऊल्या लुगड्याला दांड घालून नेसत असत.

लुगड्याला दांड म्हणजे काय याविषयी काहींना प्रश्न पडले असेल? कदाचित! जिल्ह्यानुसार, विभागानुसार नावे वेगवेगळे असू शकतात. मात्र सर्व खेड्या पाड्यातील गोर-गरीब माय-माऊली व बहिणींनी नक्कीच हे जीवन अनुभवलं असेल. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यामध्ये दांड याला म्हणायचे की, जुन्या फाटलेल्या दोन लुगडयांना शिवून नेसन्यालायक एक लुगड बनवणे. गावाकडे माय लुगडं नेसायची. पूर्वी अगदी तरुण वयापासून लुगडेच नेसण्याची पद्धत होती. त्यावेळेस नवीन कापडं फक्त सणावारालाच भेटत असत. तेही दसऱ्याला घेतले तर दिवाळीला भेटत नसत, कारण दसरा दिवाळीमध्ये अंतर ते किती दिवसाचं..! साधारण एका महिन्याचं. जे कुठेतरी एका वर्षातून सणाला भेटते ते दसरा-दिवाळी या दोन्ही सणाला कसे भेटणार, भेटलं तर रक्षा बंधनाला भावाकडून असं वर्षातून एखाद-दोन नवीन लुगडं भेटायचं. गावाकडील कामाचं स्वरूप हे रांगड! वावरात जाय. दगड, माती, ढेकळात काम कर. हे असं काम असायचं कीं, कपडे वापरा-वापरातून लवकर जीर्ण व्हायची. अन हो! आताच्या काळातल्या सारख नव्हतं. डेला वेगळा आणि नाईटला वेगळा ड्रेस, पार्टीवेअर, फॅशनेबल वगैरे असलं काहीच नव्हतं. सकाळी घातले तर दिवसभरही तेच आणि रात्री तेच, म्हणून ते कापडं तरी काय करणार बिचारे..! वापरून वापरून वितळून जायायचे.त्याला ठिगळ लावावं लागायचं. बरं! गंमत अशी व्हायची की, लुगडं पिवळ्या, लाल, निळ्या, रंगाचं त्यामुळे दुसऱ्या ठिगळाने ते लगेच उमटून दिसायचं. पण त्याची लाज नव्हती. त्यातून लज्जारक्षण व्हायचं हे महत्वाचं होतं. ठिगळही जास्त झाले. तर माय त्या फाटलेल्या जुन्या लुगड्याला जपून ठेवायची आणि अजून एखादं जुनं घरात पडलेलं लुगडं असलं की, त्या लुगड्यातील चांगला भाग कैचीने कापून घ्यायची अन अजून एका जुन्यातील चांगला भाग न वितळलेला भाग कापून घ्यायची. त्या दोन जुन्या लुगड्यातील वितळलेल्या खराब भाग वगळून त्यातील चांगल्या-चांगल्या भागातील दोन तुकड्यांपासून एक लुगडं शिवून त्यापासून सहावारी किंवा नऊवारी लुगड बनवायची. हे महिलांची उंचीनुसार असायचं. साधारण सहावारी असल्यास अठरा फुट अन नववारी असल्यास सत्तावीस ते आठ्ठावीस फूट असे. तेवढ टेपनं माप घेऊन बनवायची. त्याला मध्ये सरळ एकारेषेत शिवायची हाच तो दांड...! मग ते दोन लुगडे वेगवेगळे रंगाचे का असोनात. हरकत नव्हते परंतु, आनंद व्हायचा की, कसंतरी एक लुगडं वापरायला भेटलं. वर्षभरातून एखाद्या नवीन लुगडं भेटायचं त्याबरोबर हे वापरायला भेटायचं. दोन जुन्या लुगड्यांपासून त्यातील जुना भाग वगळून दोन्हीच्या मधे शिवून नेसण्यासाठी एक नवीन लुगडं बनवणं. हे आमच्या खेड्यापाड्यातील गोर-गरीब जीवनशैलीचे दर्शन होतं. जरी दोन लुगडे कापून बनवलेलं एक लुगडं वेगळ्या रंगाचं जरी असले तरी माय-माऊल्या आनंदाने नेसत असत. त्यांच्यासाठी जणूकाहि हे दांड भरलेलं हे नवीनच लुगडं होतं आणि तेच पुढील येणाऱ्या सणापर्यंत वापरत असत. केवळ लज्ज्यरक्षणासाठी...! तेच दांडाचं लुगडं नवरात्रीतही नेसायची.तेव्हा नव्हती ही हल्लीसारखी फॅशन, ट्रेंड..! नवरात्रीच्या नऊ दिवसाच्या वेगवेगळ्या रंगांच्या साड्या वगैरे.जिथे एक रंगाचं लुगडं धड नव्हतं तेथे नवरात्रीला वेगवेगळ्या नऊ रंगांच्या साड्या, पातळ कुठून नेसणार? मग तेव्हा नवरात्रौत्सव साजरा झाला नाही का? देवी आईची मनोभावी प्रार्थना केली नाही का? नक्कीच झालेत अन तेही अगदी आनंदात...! स्वतः देवी आईने नऊ दिवस महिषासुरासारख्या राक्षसाचा वध करण्यासाठी घनघोर युद्ध केले. मधुकैटभ, चंड-मुंड, दुर्गम या राक्षसांचा वध केला. युद्धप्रसंगी देवीआईची साडी रक्ताने माखली असेल. नऊ दिवस तिची साडी, पातळ हे दृष्टांचा विनाश करून रक्तवर्णीय झाले असेल. मग ह्या नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या, नवरंगांच्या साड्यांचा ट्रेंड आला कुठून?कशासाठी हा अट्टहास? मान्य आहे, महिलांनी नटायला हवं. थटायला हव. नक्कीच छान शृंगार करा. सजा धजा. हे स्त्रीचे सौभाग्याचे लक्षण आहे परंतु, हे असले नवीन पिढीसाठी पायंडे पाडू नका. नवरात्री उत्सव आणि हे देवी आईचं रूप शक्तीचं प्रतिक आहे. तुम्ही स्वतः खंबीर उभे राहून संकटाशी सामना करायला शिका. आत्मनिर्भर व्हा! ह्या नवरात्रीच्या नऊ रंगांच्या साड्या, पातळ नेसून त्याला व्यापारी वळण लावून नका.

फॅशन म्हणून सण उत्सव साजरे करू नका. अजूनही खेड्या-पाड्यात, वाडे-वस्तीवर लेकरं बाळं आया-बहिणींना पूर्ण अंगभर कपडे नाही. तरी आनंदाने जगताहेत. पूर्वीच्या काळात लुगड्याला दांड मारून नेसणारी माय-बहिण नवरंगाच्या साड्या नसूनही सुरक्षित होती. आनंदी होती. सुखी होती. काळानुसार आत्मनिर्भर व्हा.अध्यात्माबरोबर विज्ञानवादी दुष्टीकोण लक्षात ठेवून सण उत्सव साजरे करा.नवरात्रीच्या ह्या नवरंगांना शास्त्रोक्त किंवा धार्मिक महत्व नाही. गेल्या काही वर्षांपासून नवरात्रीत विविध रंग घालण्याची प्रथा सुरु झाली आहे. हे लक्षात असू द्या.

**सर्वांना नवरात्रोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !**

## प्रथम रूप..

शैल पुत्री नव रात्री
रूप देवीचे पहिले
स्नेह इंद्र धनू रंगले
आईचे नेत्री पाहिले

श्वेत फुले बेल पत्री
चरणकमले वाहिले
भावभक्ती निर्झर ते
अव्याहतपणेवाहले

शिव प्राप्ती वरनाती
कष्ट कठोर साहिले
उपवासे शिणवे तनू
वनातत्रासात राहिले

वृषभारूढ तेजःपुंज
महा मातेस देखिले
घट स्थापना करता
चित्रअंतरात रेखिले

त्रिशूल असूर वधाय
कुशक्तीवर रोखिले
दुजेहाती शुभकमल
चित्त कोमल राखले

तू चंद्रार्दकृतशेखरम्
शिश आदरे वाकले
वंदे वंचितलभय मा
तेजस्वि उर्जे फाकले

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# नवरात्रीचे माहात्म्य पाल्यांना सांगा !

नवरात्री म्हणजे काय ?' असा प्रश्न आताच्या शालेय विद्यार्थ्यांना विचारला तर त्यांच्याकडून नक्कीच उत्तर येईल, 'नवरात्री म्हणजे रात्री उशिरापर्यंत दांडिया खेळणे आणि नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे !' खरेतर हिंदू धर्मातील प्रत्येक सणाचे एक वेगळे वैशिष्ट्य असून स्थानपरत्वे तो साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात.

महाराष्ट्रात त्यातही मुंबई ठाण्यात गुजराती नागरिक मोठ्या संख्येने असल्याने तरुणांवर गरबा आणि दांडियाचा विशेष प्रभाव असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीत तो कसा साजरा करायला हवा याविषयी आजची पिढी अनभिज्ञ असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रात घटस्थापना ही प्रधान असते. त्याच्यासमवेत अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो, काही ठिकाणी त्रिकाळपूजन केले जाते, सुवासिनी नवरात्रीच्या दिवसांत सप्तशती ग्रंथाच्या पाठांचे वाचन करतात, कुमारिकांचे पूजन करून त्यांना भोजन दिले जाते. नऊ दिवस एकभोजनी किंवा निराहार उपवास केला जातो. रात्री देवीचा जागर केला जातो. ललिता पंचमी, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), अष्टमीचे होम हवन, सरस्वती आवाहन-पूजन अशा प्रकारचे धार्मिक विधी नवरात्रीच्या निमित्ताने केले जातात. काही ठिकाणी भोंडल्याचे आयोजन केले जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या प्रथा आता राज्यातील काही भागांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. पुढे येणाऱ्या पिढीला नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे हेही कदाचित आपल्याला सांगावे लागेल. अशी वेळ येऊ नये म्हणून नवरात्री उत्सवाचे माहात्म्य आणि तो कसा साजरा करावा याविषयीचीचे ज्ञान लहानपणीच आपल्या पाल्यांना द्यावे लागेल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदतीचा वाढता आलेख

## ८ महिन्यांच्या कालावधीत एकूण ६४ रुग्णांना ५७ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधींतर्गत जिल्ह्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारासाठी दिलासा मिळत असून, मागील ८ म हिन्यांच्या कालावधीत एकूण ६४ रुग्णांना ५७ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांच्या देखरेखीखाली कार्यरत असलेल्या जिल्हा कक्षामार्फत ही मदत वितरीत करण्यात आली. जानेवारी ते जुलै या कालावधीत ५४ रुग्णांना ४७ लाख ४८ हजार, ऑगस्टमध्ये ७ रुग्णांना ६ लाख तर १५ सप्टेंबर पर्यंत ३ रुग्णांना ४ रुपये इतकी मदत मंजूर करण्यात आली.

या निधीतून हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस व अस्थिमज्जा प्रत्यारोपण, कॅन्सर उपचार, कॉक्लियर इम्प्लांट, अस्थिबंधन, गुडघा व खुब्याचे प्रत्यारोपण, नवजात शिशु व बालकांच्या शस्त्रक्रिया तसेच अपघातग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी सहाय्य दिले जाते. निधा प्राप्त न झाल्यास रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत उपचाराची पर्यायी माहिती दिली जाते. निधीसाठी पात्रता निकषांनुसार अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी असावे, व उपचार सरकारी/ धर्मदाय/ मान्यताप्राप्त रुग्णालयात झालेले असावेत. आवश्यक कागदपत्रांसह प्रताव संबंधित रुग्णालयाकडून सादर होऊन जिल्हा कक्षामार्फत मंत्रालयाकडे पाठविला जातो. समिती परीक्षणानंतर निधी मंजूर केला जातो.

संपर्कासाठी टोल फ्रि क्रमांक १८००, १२३, २२११ तसेच प्रशासकीय इमारत, पहिला मजला, चंद्रपूर आणि मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कक्षाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.कविश्वरी कुंभलकर यांनी केले आहे

# सलून सेवेच्या दुनियेतील केसांचा किमयागार ऋषिल मोरेची गिनिज बुकमध्ये नोंद

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, ठाणे :** सलून सेवा म्हणजे ओबडधोबड चेहऱ्याला रूपवान करून सर्वसाधारण चेहऱ्याचे सौंदर्य खुलवणारे सेवा. आज या व्यवसायाने देखील आधुनिकतेची कास धरत आणि ग्राहकांच्या आवडीनिवडी जोपासत आम ूलाग्र बदल केलेले आपल्याला दिसत आहेत.



कधीकाळी केवळ केस कापणे आणि दाढी करण्यापुरता मर्यादित असलेला हा व्यवसाय आता मानवी जीवनातील महत्वाचा आणि तितकाच गरजेचा घटक बनला आहे. टीव्ही, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे या व्यवसायाने आता आपल्या कला कौशलेला वाव देऊन वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा उपयोग करीत जागतिक स्तरावर आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे. जागतिक स्तरावर देखील या क्षेत्रातील कलेचे महत्व वाढल्याने या व्यवसायातील कलाकार देखील आपल्या कला कौशल्याच्या बळावर जागतिक स्पर्धेत उतरू लागले आहेत. अशाच प्रकारची एक हेअर कलर अँड स्टाईलची स्पर्धा नुकतीच मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये ठाण्यातील सुप्रसिद्ध हेअर रचनाकार आणि रिवायवल स्टुडिओचे मालक तथा सलून ब्युटी पार्लर असोसिएशनचे समन्वयक ऋषिला मोरे यांनी सहभाग घेऊन थेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळविल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. या विजयाने ऋषिलची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड नोंद झाली.त्याने हेअर ट्रान्सफॉर्मेशन ही स्पर्धा केवळ दोन तास आणि पंधरा मिनिटांमध्ये पूर्ण करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

मुंबईत पार पडलेल्या या स्पर्धेत तब्बल ४२२ स्पर्धकांनी एकाच वेळी हेअर कलर आणि हेअर स्टाईल पूर्ण करून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आता नवा विश्वविक्रम नोंदवला आहे. आजवर इतक्या मोठ्या प्रमाणावर हेअर स्टाईल आणि कलर स्पर्धा कधीच झाली नव्हती असे ऋषीलने सांगितले.विशेष बाब म्हणजे या विक्रमी स्पर्धेत संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून ऋषील मोरे हे एकमेव हेअर स्टाईलिस्ट म्हणून सहभागी झाले होते.

दरम्यान या स्पर्धेसाठी स्पर्धकांना तीन तासांचे आव्हान देण्यात आले होते,मात्र ऋषीलने ही आव्हान केवळ २ तास आणि १५ मिनिटातच संपूर्ण हेअर ट्रॅनफॉर्मेशन पूर्ण करून सर्व परीक्षक आणि प्रेक्षकांना आश्चर्यचित करून थक्क केले.सौंदर्यशास्त्रात कौशल्य आणि वेग यांचा अद्वितीय संगम सादर करून ऋषीलने समाजाचे आणि ठाण्याचे नाव जागतिक पातळीवर पोहचविल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत असून त्याच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जनतेप्रती कृतज्ञता, तुम्ही दिलेल्या विश्वासार्हतेच्या बळावर गोरगरिबांच्या घराची स्वप्नपूर्ती - बावनकुळे

## कोराडी मंदिर टी पॉईंट येथे महादुला बस स्टॉप व पोलीस चौकीचे उद्घाटन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** आजवर केवळ व्यापक जनहित डोळ्यापुढे ठेवून काम करीत आल्याने मायबाप जनतेने मला महसूलमंत्री म्हणून स्वाक्षरी करण्यापर्यंतची संधी दिली. जनतेप्रती कृतज्ञता व तुम्ही दिलेल्या विश्वासार्हतेच्या बळावर आज कोराडी, महादुला, काम ठीसह नागपूरच्या भागातील अनेक वर्षांपासून झोपडीत राहणाऱ्या व्यक्तींना ते ज्या जागेवर राहत आहेत. त्या जागेच्या मालकीचा पट्टा अर्थात जागेची सनद देता येणे शक्य झाल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

सेवा पंधरवड्यामध्ये राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील महादुला येथे कोराडी देवीच्या महाप्रवेश द्वाराजवळ आयोजित गरजू लाभार्थ्यांना पट्टे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.या समारंभासमवेत महादूला येथील कोरडी मंदिर टी पॉईंट येथे महादुला बस स्टॉप व पोलीस चौकीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र सिंगल, अप्पर पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, पोलीस उपायुक्त निकेतन कदम, पोलीस उपायुक्त श्रीमती अश्विनी पाटील, सह पोलीस आयुक्त सत्यवीर बंडीवार आदी वरिष्ठ अधिकारी यांची पोलीस चौकीच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती होती.

पट्टे वाटप समारंभास उपविभागीय अधिकारी संदीप भस्मे, मुख्याधिकारी अमर हांडा, अनिल निधान, माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, मंगेश यादव श्री.श्री फाउंडेशनचे संस्थापक संकेत बावनकुळे, शब्बीर शेख आदी स्थानिक मान्यवर उपस्थित होते. आपल्या घराचे स्वामित्त्व प्रत्येक गोरगरीबाजवळ असले पाहिजे. या भूमिकेतून आम्ही काम करीत आहोत. एकही व्यक्ती स्वतः च्या मालकीच्या घरापासून वंचित राहू नये यासाठी पंतप्रधान आवास योजना, त्याच्या जोडीला पट्टे वाटप मोहीम व लोककल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध घरकुल योजना आपण सामाजिक कटिबद्धतेतून राबवित असल्याचे पालकमंत्री श्री बावनकुळे म्हणाले.



महादुला, कोराडी परिसरात आपण विविध उपक्रम हाती घेतले आहेत. टी पॉईंट जवळ आपण उत्तम सुलभ शोचालय बांधत आहोत. याची निगा व व्यवस्थापनाचे काम आपण बचत गटातील महिलांना देणार आहोत. याची उत्तम निगा संबंधित महिला बचत गट घेईल. याचबरोबर महादुला क्षेत्रात भव्य संविधान भवन साकारत आहोत. यासाठी एकूण आठ कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा १७ फुटी भव्य पुतळा व उद्याच्या जगात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी, शासनात उच्च पदावरील नोकऱ्यांमध्ये संधी मिळावी यासाठी भव्य अद्ययावत प्रशिक्षण केंद्र व विविध उपक्रम साकारत असल्याचे ते म्हणाले. यावेळी विविध लाभार्थ्यांना पट्टे वाटपाची सनद देण्यात आली.

# छ.शिवाजी महाराज चौकातील पनवेल सिटी सेंटर इमारत निष्कासित

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, पनवेल :** महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ड मार्फत पनवेल सिटी सेंटर, अंतिम भूखंड क्रमांक १९७, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल ही इमारत धोकादायक घोषित करण्यात आली होती. परंतु सदर इमारत वारंवार सूचना देऊन देखील रिक्त न केल्याने न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर इमारतीचे विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडित करून धोकादायक इमारत रिक्त करण्यात आली.आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार रविकिरण घोडके, उपायुक्त (अ.बां.नि.) यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक आयुक्त डॉ.रुपाली माने, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, अरविंद पाटील, अमर पाटील, प्रभाग अधीक्षक रोशन माळी, पालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, पोलिस विभाग यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या सहाय्याने या इमारतीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.




पावसामुळे धोकादायक इमारतीच्या भिंती फुगून कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी पनवेल महानगरपालिकेमार्फत घोषित केलेल्या धोकादायक इमारतीम ध्ये राहणाऱ्या नागरिकांनी त्वरित धोकादायक इमारती रिक्त करून महानगर पालिका प्रशासनास सहकार्य करावे तसेच स्वतःहून त्या निष्कासित करून घ्याव्यात. जेणेकरून जीवितहानी होणार नाही. तरी नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

# भाटमरळी येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण संपन्न

## १२ तास विद्युत पुरवठ्यामुळे प्रश्न मिटला – छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२१, सातारा :** शेतकऱ्यांना शेतीच्या सिंचनासाठी मुबलक विद्युत पुरवठा व्हावा. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प' योजना सुरु केली आहे. याच योजनेतून भाटमरळी येथे म हावितरण कंपनीच्या माध्यमातून ६ मेगा वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे या भागातील ४ हजार ५०० शेतकऱ्यांना १२ तास विद्युत पुरवठा होणार असून यामुळे शेतकऱ्यांचा विजेच्या कमतरतेचा मोठा प्रश्न मिटला आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

भाटमरळी ता. सातारा येथे ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नातून, राज्य शासनाच्या ऊर्जा विभागामार्फत उभारण्यात आलेल्या ६ मेगा वॅट क्षमतेच्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

# थोडक्यात

## उल्हासनगर झोन-४ मध्ये 'ऑपरेशन ऑल आऊट' - डीसीपी गोरे यांची धडक कारवाई



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगर झोन–४ हद्दीत दिनांक १९ ते २० सप्टेंबर २०२५ दरम्यान रात्री ११ ते पहाटे ३ वाजेपर्यंत भव्य 'ऑपरेशन ऑल आऊट' राबविण्यात आले. विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी व शैलेश काळे यांनी स्वतः उपस्थित राहून गुन्हेगारांच्या ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन केले. या कारवाईत मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करण्यात आले. उप पोलीस आयुक्त सचिन गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या विशेष मोहिमेत ४२ अधिकारी व २०५ पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. कारवाईत खालीलप्रमाणे यश मिळाले –

मद्यनिषेध कायदा – ०७ गुन्हे / ०७ नोटीस
जुगार कायदा – ०१ गुन्हा / ०२ नोटीस
NDPS कायदा (सेवन प्रकरणे) – ०४ गुन्हे / ०३ नोटीस / ०१ अटक
COPTA (तंबाखू कायदा) – १६ गुन्हे / १६ नोटीस
वॉरंट अंमलबजावणी – ०६ प्रकरणे / ०६ नोटीस
MP कायदा १४२ (हत्यार प्रकरणे) – ०१ गुन्हा / ०१ अटक
लॉजेस व बार तपासणी – १०४ ठिकाणी
हिस्टरीशीटर, गुंड, हद्दपार व्यक्ती तपासणी – १३६
वाँटेड आरोपी – ०२ अटक
जाहिर नोटीस – ३५
हत्यार कायदा (कलम ४,२५) – ०२ गुन्हे / ०१ अटक / ०१ नोटीस
महाराष्ट्र पोलीस ॲक्ट गुन्हे – ३३ (१३ छ्उ, सर्व नोटीस)
नाकाबंदी – ०८ ठिकाणी, २०८ वाहनांची तपासणी, वाहतूक पोलिसांच्या मदतीने एकूण ₹३६,००० दंड वसूल.

या मोहिमेत एकूण ०४ आरोपींना अटक करण्यात आली. उपपोलीस आयुक्त सचिन गोरे यांनी सांगितले की, गुन्हेगारांमध्ये धाक निर्माण करून नागरिकांच्या सुरक्षेसाठी सातत्याने अशा मोहिमा हाती घेतल्या जातील.

## अंबरनाथमध्ये अमली पदार्थांसह २ आरोपी जेरबंद

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, अंबरनाथ (ठाणे) :** अंबरनाथ पोलिसांनी गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे भगतसिंह नगर परिसरात धाड टाकून दोन सराईत आरोपींना अमली पदार्थांसह जेरबंद केले आहे. वपोनि सैय्यद, सपोनि गायकवाड व त्यांच्या पथकाने दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री कारवाई केली. या कारवाईत शरीफ सलीम शेख (वय ४०, रा. भगतसिंह नगर) व दुसरा साथीदार (वय २६, रा. भगतसिंह नगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्याकडून पोलिसांनी जप्त केले –
₹१,६०,००० किमतीचे ८ ग्रॅम मेफोड्रॉन (एम.डी.)
₹८०,००० किमतीचे ४ ग्रॅम हेरोईन/गर्दा
₹१६,७०० किमतीच्या ३३४ बॉटल्स थिनर (सोल्युशन)
₹१,६०० किमतीच्या ARNEX बॉटल्स

एकूण ₹२,५८,६४०/– किमतीचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. आरोपींवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली असून पुढील तपास अंबरनाथ पोलीस करीत आहेत.

## गणपतीर बाबा घाट सुशोभीकरणाचे झावरे यांच्या हस्ते उद्घाटन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पवळदरा पोखरी येथील श्री गणपतीर बाबा घाट सुशोभीकरणाचा उद्घाटन समारंभ रविवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. गावातील व परिसरातील ग्रामस्थांनी घाट सुशोभीकरणासाठी सुजित झावरे पाटील यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार अवघ्या काही महिन्यांत निधी मंजूर करून कामाला सुरुवात झाली असून, आज या काम ाचे आज उद्घाटन झाले. यावेळी सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हाईस चेअरमन किसन धुमाळ, अमोल साळवे, संजय काशिद, शिवाजी रोकडे, संजय भोर, सतीश पवार, निजाम पटेल, आनंदा केदार, संतोषशेठ शेलार, अशोक पवार, बाळासाहेब शिंदे, संतोष गाढवे, तुकाराम पवार, कुंडलिक पवार, पोपट कसबे, पिंटू कोकाटे, साहेबराव करंजेकर, मुनावर सय्यद, अन्सार पटेल, बन्सी करंजेकर, बंटी आहेर, हसन मोमिन, भाऊसाहेब चौधरी, गाडेकर दादा, रामदास पवार, अनिल शिंदे, अशोक आहेर, संजय ठुबे, तुकाराम मधे, पांडू केदार, राजू केदार, सुभाष पवार, भाना केदार, बाळासाहेब मधे, सोयल मोमिन, विक्रम पवार, ठेकेदार नागेश रोहोकले यांच्यासह गावातील व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. घाट सुशोभीकरणामुळे परिसराचा कायापालट होण्यास मदत होणार असून, ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांचे आभार मानले.

## चंद्रपूर राष्ट्रीय आदिवासी नाट्य फेस्टिव्हल - चंद्रपूर २०२५

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट तथा बाळुभाऊ धानोरकर मित्र परिवार चॅरिटेबल सोसायटी व लोकजागृती नाट्य संस्था, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आदिवासी नाट्य फेस्टिव्हल २०२५ चे आयोजन चंद्रपूर येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले. फेस्टिवलचे उदघाटन चिमूर–गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ.नामदेव किरसान यांच्या अध्यक्षतेखाली व लोकप्रिय खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी नाट्य फेस्टिवलचे मुख्य सूत्रधार डॉ.अनिरुद्ध बनकर, मुख्य महोत्सव सल्लागार व दिग्दर्शक नामदेव कन्नाके, शहर काँग्रेस अध्यक्ष रामु तिवारी, प्रमोद बोरीकर, जे.पी.गेडाम, अश्विनी खोब्रागडे, पवन मसराम, दिवाकर निकुरे, गुंजन येरमे, संगीता अमुलेकर, डॉ.ईसादास भडके, डॉ.दिलीप चौधरी हे सर्व मान्यवर उपस्थित होते.